दैनिक
# मराठवाडा पत्र
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

मंगळवार
११.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०५
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 




## पंकजाताई,तुम्ही शिट्टीवाले,घड्याळवाल्यांवर प्रेम करा

# भाजपवाल्यांसाठी आम्ही काफी-आ.धस

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे आहेत. पाटोदा येथील एका कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी 'बीड जिल्ह्यात आता आष्टीवर मला जरा जास्तच प्रेम करावं लागेल', असे विधान केले होते. त्याला भारतीय जनता पक्षाचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. पंकजा मुंडेंनी शिट्टीवाले, घड्याळवाले यांच्यावर प्रेम करावं. भाजपवाल्यांवर प्रेम करायला मी काफी आहे, असा पलटवार धसांनी केला आहे. तसेच, तुमच्या परळी मतदारसंघाकडेही लक्ष द्या, असे आवाहन केले आहे.**

आमदार सुरेश धस म्हणाले, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी गेल्या निवडणुकीत आमच्यावर, आष्टी मतदारसंघावर खूप प्रेम केले आहे. पंकजा मुंडे यांचे निवडणुकीतील व्हिडिओ जरा आष्टी मतदारसंघात फिरवा. त्यांच्यावर प्रेम असणारे लोकच तिथं हजर असतील. पंकजा मुंडे यांनी शिट्टीवाले, घड्याळवाले यांच्यावर प्रेम करावं. आष्टी मतदारसंघातील भाजपच्या कार्यकर्त्यांवर आणि लोकांवर प्रेम करायला मी काफी आहे. त्यांनी भाजपवाल्यावर ▶▶पान २ वर

### पंकजा मुंडे काय म्हणाल्या होत्या?

बीड जिल्ह्यात आता आष्टीवर मला जरा जास्तच प्रेम करावं लागेल. तो परळी मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला गेला आहे ना. आष्टी हा भारतीय जनता पक्षाचा मतदारसंघ आहे. मंत्री म्हणून मला जरा काकणभर जास्तच प्रेम करावं लागेल. मला आष्टीत सारखं यावं लागेल. भाकरी भाजी द्याल ना. मी आष्टीतील प्रत्येक कामात लक्ष देणार आहे. पण, त्याचा अर्थ तुम्हाला जसा घ्यायचा आहे, तसा घेऊ नका, असेही पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले होते.



# मी गुंडाला गुंड अन् बंडाला बंड आहे!

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील भगवान गडाला भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समर्थकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले. पंकजा मुंडे यांनी यावेळी विविध विषयांवर आपली रोखठोक मते मांडली. त्या म्हणाल्या, जोपर्यंत लोकांना मी हवी आहे, तोपर्यंत मी काम करत राहीन. पण ज्यावेळी लोक म्हणतील की आता गरज नाही, तेव्हा मी घरच्या गादीवर बसेन. भगवान गडावरील भाषणात राजकारण आणि धर्मकारण यावरही त्यांनी परखड भाष्य केले. त्या म्हणाल्या, राजकारण करणाऱ्या माणसाने धर्मकारणात हस्तक्षेप करू नये, पण दोन्ही गोष्टी एकमेकांशी निगडीत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण घ्या, तेव्हा देखील राजसत्ता आणि धर्मसत्ता हातात हात घालून चालत होती. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्यही संपूर्ण जग बघत आहे. भगवान बाबांबद्दल बोलताना त्यांनी आपल्या श्रद्धेचा उल्लेख करत सांगितले, भगवान बाबा यांच्याविषयी माझ्या मनात काय आहे हे मी शब्दांत सांगू शकणार नाही. त्यांच्या दर्शनासाठी मला कुठेही जावे लागत नाही, मी डोळे मिटले तरीही मला त्यांचे साक्षात दर्शन होते. त्यांनी कधीच स्वार्थासाठी काम केले नाही, त्यांचा त्याग आणि साधना आपल्यासाठी प्रेरणादायक आहे. मुंडे यांनी आपल्या स्वागतासाठी होणाऱ्या मोठ्या स्वागतावरही मिश्किल भाष्य केले. त्या म्हणाल्या, लोक मला विचारतात, तुम्ही जिथे जाता तिथे ▶▶पान २ वर

**पंकजा मुंडेंचा सडेतोड इशारा**

## बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या

# अध्यक्षपदी सत्येंद्र पाटील,उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार

बीड । प्रतिनिधी

बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची तर उपाध्यक्षपदी हाजी इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वागत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राजेंद्र मस्के, प्रा.विजय पवार, मिरगणे सर, माजी प्राचार्य अनंत नखाते सर, ज्येष्ठ शिक्षक नेते कल्याण वाघमारे सर, रामनाथ डाके सर, अप्पासाहेब रसाळ सर बाळासाहेब गोरे, अशोक रोमण, बंडु कदम, झुंजार धांडे, राजेंद्र साळुंके, जयमल्हार बागल, विशाल तांदळे, दिपक हजारे, मिठ्ठन कोटुळे, दत्ता साळुंके, अभय बीडकर, सचिन हरनमारे, वल्लभ चिरके, गणेश लोंढे, अभिजीत मसकर, पप्पू लांडे, दत्ता कशिद, सुरेश खुर्णे, वामन घोडके, महेंद्र शिराळे यांच्यासह अनेक शिवप्रेमींची उपस्थिती होती. बीड शहरात गेल्या काही वर्षापासून अत्यंत उत्साहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा केला जातो. सबंध बीडकर नागरिक या शिवजयंती सोहळ्यामध्ये सहकुटुंब, सहपरिवार सहभागी होत असतात. यंदाही बीडचा हा सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळा आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सर्व सहकारी, पदाधिकारी, मित्र परिवाराच्या वतीने अत्यंत आनंददायी वातावरणात उत्साहात साजरा केला जाणार आहे. या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड तसेच शिवजयंतीच्या अनुषंगाने चर्चा व विनिमय करण्यासाठी आणि शिवजयंती उत्सवामध्ये यावर्षीच्या आयोजित कार्यक्रमासंबंधी निर्णय घेण्यासंदर्भात दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शहरातील ▶▶पान २ वर



# पत्रकार संघाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी बाळासाहेब वरकड

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी बाळासाहेब वरकड यांची निवड करण्यात आल्याची घोषणा राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी केली. या निवडीबद्दल बाळासाहेब वरकड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. वरकड हे गेल्या वीस वर्षापासून वर्तमानपत्र क्षेत्रात काम करत असून ते दै. मराठवाडे पत्र चे उपसंपादक आहेत.ङ्गमहाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, यांच्या मान्यतेने राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी घोषित केली. जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान गेल्या वीस वर्षापासून मशिन ऑफरेटर, वर्तमान पत्राचे ग्राफीक डीझायनर, उपसंपादक अशा वेगवेगळ्या विभागात काम करणारे दै. मराठवाडा पत्रचे उपसंपादक बाळासाहेब वरकड यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. उर्वरीत कार्यकारिणीमध्ये जिल्हा उपाध्यक्षपदी दत्ता आजबे, आप्पासाहेब महानोर, प्रशांत लहुरीकर, सचिवपदी राहुल गायकवाड, सहसचिव ▶▶पान २ वर



# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन उधळत आंदोलन-डॉ.ढवळे**



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रें बंद झाल्याने २३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीविना घरात पडुन असुन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागुन प्रति क्विंटल १००० रूपये आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन ▶▶पान २ वर

# शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडावा



बीड । प्रतिनिधी

देशातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र अर्थसंकल्प मांडावा अशी मागणी करीत आज सोमवारी (दि. १०) ऑल इंडिया किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी ▶▶पान २ वर

**ऑल इंडिया किसान सभेची मागणी**

# नगर रोडच्या डिव्हायडरच्या कामाला सुरुवात



बीड । प्रतिनिधी

बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ते चऱ्हाटा फाट्यापर्यंत सिमेंट रोडचे काम चालू आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून आज या रोडवर डिव्हायडर बसवण्याचे काम सुरू झाले आहे. या कामासह रस्त्याच्या कामाची आज नॅशनल हायवेचे कार्यकारी अभियंता श्री. भोपळे आणि जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी संयुक्त पाहणी केली. डिव्हायडरच्या कामाला आज सुरुवात करण्यात आली. त्याचप्रमाणे येत्या पंधरा दिवसात नगर नाक्यापर्यंतचा रस्ता वापरासाठी पूर्णपणे खुला होईल. आणि उर्वरित कामाला सुरुवात होईल. त्याचप्रमाणे थेट चराटा फाट्यापर्यंत दोन महिन्यात काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी इंजिनियर भोपळे यांनी ॲड. देशमुख यांना सांगितले. गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याचे कामकाज चालू आहे. मात्र आता या कामाने गती घेतली ▶▶पान २ वर

**कार्यकारी अभियंता आणि ॲड. देशमुख यांनी केली संयुक्त पहाणी**

# विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरण धुमधडाक्यात संपन्न!

**ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि आदर्श विद्यालय उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे महाकरंडकाचे मानकरी!**

बीड । प्रतिनिधी

कलाकारांचा अनोखा महाकुंभ बनलेल्या कलावैभवसिद्ध बालेकिल्ल्याचा विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरण काल रोजी मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाले असून १४ हजार सात बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहचला. चंपावती महोत्सवात दि. १ फेब्रुवारी पासून ते दि. ८ फेब्रुवारी पर्यंत नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण काल रोजी संपन्न झाले. ज्यामध्ये ३६४ विजेत्या बाल कलाकारांना पारितोषिके देण्यात आली. चंपावती महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करत सर्वाधिक बक्षिसे मिळवणाऱ्या इंग्रजी माध्यमाती ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि मराठी माध्यमातून आदर्श विद्यालयाने उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे



महाकरंडकावर आपले नाव कोरले तर जेष्ठ संगीतकार भरत अण्णा लोळगे, नृत्यकर्मी सौ अनुराधा निकम, नाट्य कलावंत महेंद्र खिल्लारे, नृत्यकर्मी वैभवी टाकणखर आणि समाजसेवक डॉ गणेश ढवळे यांना चंपावती सन्मान या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या ▶▶पान २ वर




दैनिक जनसामान्यांचे शस्त्र
मराठवाडा पत्र



दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आम आदमी पक्षा'चा कपाळमोक्ष होणार ही काळ्या दगडावरची रेघ होती. तसेच झाले. या निवडणुकीत भाजपने दोन तृतीयांश बहुमत मिळवत 'आप'ला सत्ताच्युत केले. भाजपच्या विजयाची आणि म्हणून 'आप'च्या पराजयाची अपरिहार्यता, त्या मागील कारणे इत्यादींचा ऊहापोह करण्याआधी भाजपचे अभिनंदन करणे आवश्यक ठरते. 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल हे एक अत्यंत भंपक गृहस्थ आणि त्याहूनही अधिक भंपक राजकारणी आहेत. 'लोकसत्ता'ने आतापर्यंत अनेकदा त्यांच्या आणि 'आप'च्या राजकारणाच्या मर्यादा दाखवून दिल्या. आपण म्हणजे कोणी नैतिकशिरोमणी आहोत आणि अन्य झाडून सारे जणू अनैतिकांची अवलाद असा या केजरीवालांचा तोरा शिसारी आणणारा होता. प्रत्यक्षात ते तसे असते तर एकवेळ सहन करता आले असते. पण 'आप' म्हणजे अन्य कोणत्याही राजकीय पक्षासारखा 'वरून कीर्तन आतून तमाशा' असाच प्रकार. नाटकीपणा आणि केजरीवाल हे जणू एकमेकांचे समानार्थी शब्द असावेत असे त्यांचे वर्तन. 'आप' म्हणजे ना धड राजकीय पक्ष, ना धड स्वयंसेवी संस्था असे ना गाढव ना घोडा असे खेचर. स्वयंसेवी संस्थेचा आव आणून राजकारण करण्याचा त्यांचा प्रयोग काही काळ यशस्वी झाला. पण काही काळच. कारण आपल्याकडे नैतिक असणाऱ्यापेक्षा मिरवणाऱ्याचेच स्तोम अधिक. आणि या असल्या मिरवण्यात केजरीवालांच्या श्रावणबाळी प्रतिमेची भुरळ अनेकांस काही काळ पडली. पण त्यांची ही नौका आज ना उद्या भाजपच्या खडकावर आदळून फुटणार हे दिसत होते. ते एकदाचे झाले. याचे कारण भाजपशी लढण्यास केवळ नाटकीपणा पुरेसा नाही, हे केजरीवाल यांस उमगले नाही. त्या एका मुद्द्यावरही भाजपत केजरीवालांपेक्षा किती तरी सराईत अभिनेते आहेत. दुसरे असे की आजच्या भाजपशी सामना एकास-एक असा नसतो. भाजपशी लढणे म्हणजे केवळ दोन हात असणाऱ्याने दशभुजा पैलवानास अंगावर घेण्यासारखे असते. ते केजरीवालांच्या क्षमतेपलीकडचे होते. नायब राज्यपाल, केंद्रीय गृहमंत्रालय, केंद्र सरकार, निवडणूक आयोग, केंद्रीय यंत्रणा असा हा एक विरुद्ध पाच असा सामना होता. हे नमूद करताना भाजपच्या कमालीच्या विजिगीषू वृत्तीस वा १२ महिने १४ काळ निवडणूक सज्ज असण्याच्या क्षमतेस कमी लेखण्याचा उद्देश नाही. याबाबत आज कोणताही एक वा सर्व राजकीय पक्ष एकत्र मिळूनही भाजपशी स्पर्धा करू शकत नाहीत. त्याचमुळे लोकसभा निवडणुकीत बसलेला फटका क्षणार्धात विसरून भाजप पुढच्या तयारीस लागला. त्यास दिल्ली खुपत होती. इतका दिग्विजयी पक्ष; पण राजधानीतील विजय त्यास हुलकावणी देत होता. ही सल दूर करण्यासाठी भाजप सर्व ताकद पणास लावणार हे दिसत होते. त्या तुलनेत केजरीवाल हे गाफील राहिले. एका बाजूला प्रत्येक पावलावर आडवे येणारे नायब राज्यपाल आणि आडवे करू पाहणारे केंद्र सरकार असताना केजरीवाल यांनी अधिक राजकीय शहाणपण दाखवणे गरजेचे होते. पण त्याचाच त्यांच्या ठायी अभाव. नैतिकतेचा आव आणणाऱ्याने प्रत्येक पाऊल जपून टाकायचे असते. सत्तेसाठी आतुर भाजप हा असतील नसतील ते घोटाळे बाहेर काढणार, निदान तसे आरोप करणार, नायब राज्यपाल चौकशीचे आदेश देणार, केंद्रीय यंत्रणा तत्परतेने त्याची दखल घेणार हे सारे असेच होणार हे उघड होते. याचे भान केजरीवाल यांस राहिले नाही. या सर्वांस पुरून उरायचे तर कारभार तरी चोख हवा. दिल्लीत तेही नाही. रस्ते, पाणी, शहर व्यवस्थापन आदी प्रत्येक मुद्द्यावर दिल्लीकरांस 'आप'चा अनुभव अलीकडच्या काळात असमाधानकारक होता. म्हणजे एकेकाळी ही मंडळी मिरवत होती तो प्रामाणिकपणाही नाही आणि समाधानकारक कामही नाही. याच्या जोडीला निवडणुका जाहीर झाल्यावर केली गेलेली आठव्या वेतन आयोगाची घोषणा आणि अर्थसंकल्पातील १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरची करसवलत या दोन घोषणा.

# 'आप'ले मरण पाहिले...



त्या सरळसरळ निवडणूक-केंद्री होत्या. पण निवडणूक आयोग आणि 'वाईट पाहू नये, वाईट बोलू नये आणि वाईट ऐकू नये' म्हणून डोळ्यावर, तोंडावर आणि कानावर हात ठेवून बसलेल्या आपल्या पूर्वजांची प्रतिमा यात साम्य असल्याने या सगळ्याची दखल घेतली जाणे अशक्य होते. या अर्थसंकल्पीय आयुधांच्या सहाय्याने भाजपने मध्यमवर्गीय मते सहज आपल्याकडे वळवली. सबब केजरीवालांचा कपाळमोक्ष अटळ होता. त्यातल्या त्यात त्यांना करता येण्यासारखी एकच गोष्ट होती. काँग्रेसशी हातमिळवणी. पण या सहकाराच्या मुद्द्यावर अधिक कपाळकरंटे कोण, काँग्रेस की आप असा प्रश्न पडावा अशी स्थिती. दोघेही आडमुठे आणि आपल्या राजकीय कर्तृत्वापेक्षा अधिक मोठा अहं असलेले. त्यामुळे होता होता काँग्रेस आणि आप ही निवडणूकपूर्व आघाडी होऊ शकली नाही. या दोन्ही पक्षांचे वर्तन कडाकडा भांडणाऱ्या नवरा-बायकोने एकमेकांस "मी मरेन पण तुला विधवा/विधुर करेन" अशी धमकी द्यावी आणि ती प्रत्यक्षात आणावी असे होते. निकालावरून दिसते ते असे की किमान १३ मतदारसंघ असे आहेत की जेथे काँग्रेसला पडलेली मते पराभूत विजयी भाजप उमेदवार आणि पराभूत 'आप' उमेदवार यांच्या मतांमधील फरकापेक्षा जास्त आहेत. खुद्द केजरीवालांच्या मतदारसंघातही तसेच. याचा अर्थ काँग्रेस आणि आप ही निवडणूक आघाडी झाली असती तर किमान या १३ ठिकाणी तरी निकाल वेगळा लागू शकला असता. बरे; इतके करून काँग्रेसच्या मतांत तरी सणसणीत वाढ झाली आहे असे म्हणावे तर तेही नाही. इतका जिवाचा आटापिटा करून काँग्रेसची मते जेमतेम दोन टक्क्यांनी वाढली. विधानसभेत त्या पक्षाची पाटी कोरी ती कोरीच. ही सलग तिसरी विधानसभा अशी असेल की जेथे काँग्रेसचा एकही आमदार नसेल. एकेकाळी ज्या पक्षाने दिल्लीवर एकहाती सत्ता गाजवली आणि शीला दीक्षित, अजय माकन आदी नेते दिले, त्या पक्षाचा एकही आमदार विधानसभेत नाही. महाराष्ट्राप्रमाणे याही निवडणुकीत राहुल गांधी यांनी जेमतेम चार सभा घेतल्या. तीन सभा रद्द केल्या. या निवडणुकांच्या काळात समग्र काँग्रेस नेतृत्व बेळगावी, बाबासाहेब आंबेडकरांचे महु इत्यादी ठिकाणी 'संविधान बचाव' वगैरे उदात्त लढ्यात मग्न होते. आपला पक्ष वाचणार की नाही याची फिकीर नाही; पण बघावे तेव्हा त्या पक्षनेत्याच्या हातात ते संविधान. असेच वागत राहिल्यास संविधानही नाही वाचणार आणि पक्षही गाळात गेलेला असेल. 'आप'शी हातमिळवणी न करता लढायचेच होते तर ते तरी जीव ओतून तरी लढायचे. पण तेही नाही. तेव्हा आप आणि काँग्रेस यांच्या आत्मकेंद्री राजकारणामुळे 'तुला नाही; मला नाही; घाल भाजपला' असे झाले. दिल्ली विधानसभेच्या या थप्पडीनंतरही विरोधी पक्षीयांस अक्कल आली नाही, तर पुढेही असेच होईल. महाराष्ट्र गेला, दिल्ली गेली. आता उद्या बिहार याच मार्गाने जाणार नाही असे नाही. तेव्हा भाजपशी दोन हात करायचे असतील तर कित्येक पट अधिक शहाणपण आणि समजूतदारपणा दाखवावा लागेल. 'आपले मरण पाहिले म्या डोळा' हे आता 'आप'बाबत झाले. उद्या इतरांवरही हीच वेळ येऊ शकते.

## पान १ वरून

### पंकजाताई, तुम्ही शिट्टीवाले...

प्रेम करू नये, अशी माझी पंकजा मुंडे (झरपज्ञरक्षर चींपवश) यांना विनंती राहील, असेही धस यांनी नमूद केले आहे. ते म्हणाले, आष्टी विधानसभा मतदारसंघ हा भारतीय जनता पक्षाचाच आहे. त्यावर जास्तीचं लक्ष द्या. त्याला आमची काहीही हरकत नाही. पण, आमची मागणी एवढीच आहे की, तुमचा मूळ मतदारसंघ परळी आहे, तिकडं जरा जास्त लक्ष द्या. कारण तिथलं सगळंच हायजॅक झालं आहे. त्यांनी तिकडं बघावं. आष्टी हा आताच भाजपचा मतदारसंघ कसा झाला आहे. विधानसभेच्या निवडणुकीत त्या म्हणाल्या होत्या की, केज हा एकच मतदारसंघ माझा आहे. मग आष्टी भाजपचा मतदारसंघ कसा झाला. पंकजा मुंडे जे बोलतात ना, त्यावर त्यांनी ठाम राहावं. निवडणूक कालावधीत त्यांचा भाजपचा एकच मतदारसंघ होता. याबाबत त्यांचं स्वतःचं स्टेटमेंट आहे. निवडणुकीत भाजप गंधर्व विवाह मतदारसंघ होता. आता पवित्र विवाह कसा झाला, असा सवाल सुरेश धस यांनी केला.

### मी गुंडाला गुंड...

तुमच्यासाठी एवढे मोठे स्वागत का असते? पण मलाच माहीत नसते की कोण एवढी तयारी करतं. मी नेहमी सांगते की जेसीबीने फुले उधळू नका. आता मी रागावले म्हणून फटाके फोडणे बंद केले. पर्यावरण मंत्री समोर फटाके फोडून पर्यावरणाची वाट लावता का? पंकजा मुंडे यांनी आपल्या रोखठोक शैलीत राजकीय विरोधकांना इशारा देत सांगितले, मी कोणत्याही गुंडाला घाबरत नाही. मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड आहे! कोयत्यांना धार देण्यासाठी मी कायम उभी राहीन, पण चुकीचा अर्थ काढू नका. नवीन पक्ष स्थापनेबाबतच्या अफवांवरही पंकजा मुंडे यांनी भाष्य केले. त्या म्हणाल्या, दिल्लीमध्ये नरेंद्र मोदींची सत्ता आहे, राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत आणि मी स्वतः मंत्री आहे. अशा परिस्थितीत मी नवीन पक्ष का काढेल? काही जण अफवा पसरवत आहेत, पण यामध्ये काहीही तथ्य नाही. त्यांनी आपल्या मंत्रीपदावरही भाष्य करत सांगितले, मला मंत्री झाले काय, नाही झाले काय, त्याने काही फरक पडत नाही. लोकांचे प्रेम आणि पाठिंबा असलाच पाहिजे. पण मंत्री असल्याने अधिकार येतात आणि त्याचा वापर विकासासाठी करायला हवा. माझ्याकडे सत्तेचे १८२५ दिवस आहेत, त्यातील २२५ दिवस असेच जातात. उरलेल्या १६०० दिवसांत माझ्या विभागाकडून राज्याच्या प्रत्येक भागात न्याय देण्याचे काम करणार आहे. भगवान गडावरील त्यांच्या भाषणानंतर त्यांचे समर्थक अधिक उत्साही झाले असून, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांच्या राजकीय वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या परखड आणि आक्रमक शैलीमुळे भाजपच्या गोटातही उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### बीड शहर सार्वजनिक...

शासकीय विश्रामगृहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कार्यकारिणीच्या व्यापक बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला शिवप्रेमी नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित होते.

### शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र...

कार्यालय समोर आंदोलन करुन मागण्यांचे निवेदन दिले. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारने २४.०३ लाख कोटी रुपये कार्पोरेट क्षेत्रासाठी कर्जमाफी दिली असताना शेतकऱ्यांच्या समस्या कडे दुर्लक्ष केलेले आहे. कृषी आणि शेतकरी कल्याणासाठी चे अर्थसंकल्पातील वाटप ५ हजार कोटी रुपयांनी कमी करून केवळ १.७१ लाख कोटी रुपये केले गेले आहे. जे एकूण अर्थसंकल्पाच्या तीन टक्के आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या ६०% लोकसंख्येसाठी ही गंभीर अन्यायाची बाब आहे. प्रधानमंत्री फसल बीमा योजना सारख्या महत्त्वाच्या योजनांमध्ये ३ हजार ६२२ कोटी रुपयांची कपात करण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दहा हजार रुपये देण्याची अपेक्षा होती पण ते केवळ सहा हजार रुपये इतकेच राहिले आहे. त्यामुळे ऑल इंडिया किसान सभेने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र किसान अर्थसंकल्प सादर करण्याची मागणी सातत्याने केलेली आहे. मात्र सध्याच्या अर्थसंकल्पातून सरकारची किसान विरोधी भूमिका उघड होत आहे. त्यामुळे सरकारने येणाऱ्या काळात स्वतंत्र किसन आयोग नेमून शेतकऱ्यांच्या अडीअडचणी दूर कराव्यात अशी मागणी केली आहे. या निवेदनावर कॉ. नामदेव चव्हाण, कॉ. भाऊ प्रभाळे, कॉ. ज्योतीराम हुरकुडे, कॉ. असाराम मुळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पत्रकार संघाच्या...

नितीन मुंडे, सदस्यपदी गणेश जाधव, उदय नागरगोजे, रामेश्वर जाधव, बंडु दुबाले, मनोज गव्हाणे, निलेश येलगिरे, निलेश वाघमोडे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून निवडीनंतर प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी बाळासाहेब वरकड यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### सोयाबीन हमीभाव...

हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी घोषणाबाजी करत सोयाबीन उधळुन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार,पांडुरंग हराळे, बप्पासाहेब पवार, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी ४४ हजार ७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे सोयाबीन खरेदीसाठी १ आक्टोबर ते १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज केले होते.त्यानंतर १५ आक्टोबर २०२४ पासुन नाफेडच्या वतीने जिल्ह्यातील ३० केंद्रावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्ह्यातील २० हजार ९६९ शेतकऱ्यांची ५ लाख ९४ हजार २०१ क्विंटल सोयाबीन खरेदी करून केंद्र बंद करण्यात आले.मात्र नोंदणी केलेले २३ हजार ७७५ शेतकरी वंचित राहिले असल्याने आजही त्यांच्या घरात सोयाबीन पडुन आहे. शासनाने हमीभाव खरेदी केंद्रे बंद केल्याने आता शेतकऱ्यांना हे सोयाबीन खुल्या बाजारात बेभावाने विकावे लागणार आहे. शासनाने यावर्षी सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव दिला होता. खर्च आणि उत्पन्नाचे गणित जुळवताना हा भाव शेतकऱ्यांना परवडणारा नाही.मात्र पर्याय नसल्याने शेतकरी शासनाच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करत होते.आता हे खरेदी केंद्रेही बंद केल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारात ३८०० ते ४००० रूपये प्रति क्विंटल दराने बेभाव विक्री करावी लागत आहे. वास्तविक पाहता आधारभूत धान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन अथवा ईतर कोणताही शेतीमाल खरेदी करणं कायद्याने गुन्हा आहे.परंतु याची पडताळणी करणारी यंत्रणाच नसल्याने शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट सुरू आहे. त्यामुळे शासनाने हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सितारामन म्हणतात विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतातकृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (-ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) वापर करा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे म्हणतात महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणार कृषी मंत्री शेतकऱ्यांना ड्रोनचा शेतीमध्ये वापर करण्याचा सल्ला देतात मात्र दुसरीकडे शेतकरी विरोधी धोरणे राबवतात. एकंदरीत सरकारचा हा दुटप्पीपणा असुन यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.याबद्दल शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी आहे.

### विक्रमादित्य चंपावती...

वाढदिवसानिमित्त बीड कलाकार आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील गलधर यांच्या संकल्पनेतून साकार झालेला चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकमध्ये नोंद करून बीडचा नवा इतिहास रचण्यासाठी तयार झाला असून लवकरच लिमका गिनीज बुक टीमला पाचरण करणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे. चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरणासाठी प्रमुख अतिथी राष्ट्रवादी नेते अमरसिंह पंडित आणि दै लोकाशाचे संपादक विजय बंब उपस्थित होते. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर तथा बीड जिल्हा शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. ✻ बाल कलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव कदापि बंद होऊ देणार नाहीत- जगताप, मुळूक, गलधर : चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा आता आमची राहिलेली नसून ती जिल्ह्याभरातील बाल कलाकारांच्या हक्काची आणि जिव्हाळ्याची स्पर्धा बनली आहे. बाल कलाकार इथे एकत्रित येऊन कलेचा आविष्कार सादर करतात, बक्षीसे मिळवतात यामुळे कलाकार आणि शिवसेनेच्या प्रेमाचा हा उत्सव आम्ही कदापि बंद होऊ देणार नाहीत. चंपावती महोत्सव चंपावती महोत्सव एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा वर्षनुवर्षे सुरु राहील आणि यातून हजारो कलाकार घडत राहतील व बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या गाजत राहील असा निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आपल्या भाषांनातून केला. ✻ उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाल कलाकारांना रंगमंच मिळाला- अमरसिंह पंडितः कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीड जिल्हा ओळखल्या जातो. याच बालेकिल्ल्यातील १४ हजार सात बाल कलाकारांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रंगमंच मिळाला याचे मनस्वी समाधान आहे. विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळावा म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी चंपावती महोत्सवाचे सुंदर असे आयोजन केलेले आहे असे मत राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केले.

### बीड शहरातील...

आहे. त्याचप्रमाणे एका बाजूने रस्ता चालू झाल्यानंतर दुसऱ्या बाजूने काम करणे अधिक सोपे होणार असल्याने कामातील गती वाढणार असल्याचे कार्यकारी अभियंत्यांचे म्हणणे आहे. या चालू असलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत ड. देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. बीड शहरासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून या रस्त्यावरील अतिक्रमणे रोखणे देखील काळाची गरज आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर एकही अतिक्रमण होऊ नये, यासाठी नॅशनल हायवे अथोरिटीने दक्षता घ्यावी, असेही ड. अजित देशमुख यांनी यावेळी सांगितले.

नमुना ई-४ [नियम ७५ (२) (ड) पहा]

**निवडणूक निर्णय अधिकारी — श्री.एस के चव्हाण, पदनाम—मुख्य लिपीक सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै, ता.परळी वै, जि.बीड..**
**सहकारी संस्थेचे नाव : - ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम, २०१४ च्या **नियम** ७५ (२) (ड) प्रमाणे अधिकाराचा वापर करून आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची सन २०२५ ते २०३० या कालावधीची निवडणूक घेणेकरिता मी. **श्री.एस के चव्हाण, पदनाम—मुख्य लिपीक सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै, ता.परळी वै, जि.बीड.** मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड आणि मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांच्या मान्यतेने, **ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड** यांच्या संस्थेच्या समिती सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला, निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे **ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्याची / सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करीत व जाहिर करीत आहे अणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या (यात यानंतर ज्याचा निर्देश संबंधीत मतदारसंघ असा करण्यात आला आहे.) संबंधातील निवडणुका घेण्याचे नियत करीत आहे.

| अ.क. | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | विधीग्राह्य नामनिर्देशनपत्रांची सूची प्रसिद्ध करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक व वेळ,स्थळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक , वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | संस्थेच्या क्रियाशील सभासदांतून निवडलेले (सर्वसाधारण गटातून) | ६ | दि.११.०२.२०२५ ते दि.१७.०२.२०२५ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै यांचे कार्यालयात. | दि.११.०२.२०२५ ते दि.१७.०२.२०२५ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज संध्या ४.०० वा. कार्यालयाचे सूचना फलकावर. | दि. १८.०२.२०२५ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै यांचे कार्यालयात. | दि.२०.०२.२०२५ दुपारी २.०० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै कार्यालयाचे सूचना फलकावर. | दि.२०.०२.२०२५ ते ०६.०३.२०२५ दि.वेळ स.११.०० तेदु. ३.०० वाजे पर्यंत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै यांचे कार्यालयात. | दि.०७.०३.२०२५ स. ११.३० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै यांचे कार्यालयात. | दि.१६.०३.२०२५ वेळ सकाळी ८.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत. | दि. १६.०३.२०२५ मतदान संपलेनंतर | दि.१६.०३.२०२५ मतमोजणी संपलेनंतर लगेच. |
| २ | महिला प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| ३ | अनु.जाती/जमाती प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| | एकूण | ११ | | | | | | | | | |

**टीप** :- १) स्तंभ क्र.६ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाईल. २) संस्थेची अंतिम मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात रु. १००/- अदा करून विकत मिळू शकेल.२) संस्थेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात रु. १००/- अदा करून विकत मिळू शकेल. ३) सूचना फलकावर प्रसिद्ध केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाची आहेत. ४) अनुसूचित जाती जमातीच्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत रु. ३००/- व अनुसूचित जाती जमातीच्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत रु.१०००/- अनामत ठेव भरणा केल्याची पावती जोडावी लागेल. ५) निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ८ मधील दिनांकास व ठिकाणी सकाळी ११.३० वा.करणेत येईल.६) नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर त्यांची प्रसिद्धी, मतदान व मत मोजणी दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम सार्वजनिक सुट्ट्याखेरीज सुरू राहील. ६) मतदानाचे व मतमोजणीचे स्थळाबाबतची घोषणा दि.१६/०३/२०२५ रोजी करण्यात येईल.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै, ता.परळी वै, जि.बीड.**

**(आर बी कातळे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै**
**ता.परळी वै, जि.बीड**

**(आर बी कातळे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै, ता.परळी वै, जि.बीड**

**प्रत** :-
१. चेअमरन / सचिव, **ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड या** संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी.
२. मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वै, ता.परळी वै, जि.बीड यांचे कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी.
३. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी.

## पान ४ वरून

### प्रदूषित पाण्याचा पुर्नवापर...

पाणी या नद्यांमध्ये थेट मिसळले जाते. प्रदूषित पाणी मिसळल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. प्रदूषित पाणी थेट पाण्याच्या प्रवाहामध्ये मिसळू नये यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. नद्या व तलावांचे संवर्धनही भविष्याची गरज ओळखून त्याचा सुनियोजित तांत्रिक आराखडा पर्यावरण विभागाकडून बनवला जाणार आहे. तसेच या क्षेत्रामध्ये लोकांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान माहिती होण्यासाठी पर्यावरण विभाग एक तांत्रिक कक्ष देखील स्थापन करून करून त्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रशिक्षण देणार आहे. जेणेकरून प्रदूषणाच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवता येतील असेही मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, शेतीमध्ये पिकांवर फवारणी करण्यात येणारी कीटकनाशके यामुळे देखील पाणी प्रदूषित होत आहे. जल,वायू,मृदा प्रदूषण रोखण्यासाठी परस्पर संबंधित शासनाच्या विभागांच्या समन्वयाने प्रदूषण टाळण्यासाठी काटेकोरपणे उपायोजना करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आवश्यक तिथे जनजागृती करणे.जिथे कायद्याची गरज भासल्यास कायदेशीर दृष्ट्या कारवाई करणे. त्याचप्रमाणे कायदा व नियमांची माहिती लोकांना करून देणे यासाठी देखील पर्यावरण विभाग भर देणार आहे. पर्यावरणावर प्रेम करणारी आपली संस्कृती आहे. ही संस्कृती जपण्याचे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.प्रत्येकाने हे प्रदूषण रोखण्यासाठी काळाची गरज ओळखून आत्तापासूनच काम केले तर आपण पुढील पिढीला आपण चांगले वातावरण आणि चांगले आरोग्य देऊ शकतो.पर्यावरणासाठी काम करून आपण सर्वांचे जीवन सुसह्य करणार आहोत त्यामुळे या कार्यशाळेचा नक्कीच सर्वांना लाभ होईल असेही त्या म्हणाल्या. प्रधान सचिव के. एच. गोविंदराज म्हणाले की, शहरामध्ये निर्माण होणारे सांडपाणी आपल्या पिण्याच्या पाण्याच्या स्तोत्रात मिसळले जाते.मात्र प्रदूषित झालेल्या सांड पाण्याचा जर आपण त्याच ठिकाणी पुनर्वापर केला तर प्रदूषणाची समस्या सुटण्यासाठी मदत होऊ शकेल. आपल्याला प्रदूषणाची वस्तुस्थिती माहिती आहे आणि त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम ही माहिती आहेत. शासनाच्या प्रत्येक विभागाने परस्पर सहकार्याने या समस्यावर मात करण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्रणा बसवणे. स्थानिक ठिकाणी प्रदूषण कमी होण्यासाठी जनजागृती करणे यासारखे उपाय करणे गरजेचे आहे.आज झालेल्या कार्यशाळेतून मिळणारे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आपल्या क्षेत्रांमध्ये पोहोचवा असेही त्यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांनी महाराष्ट्रातील पालिका क्षेत्रातील प्रदूषित पाण्याचे सद्यस्थिती आणि त्याचा होणारा परिणाम याविषयी सादरीकरण केले. इंदोर येथील डॉ. राकेश कुमार, आयआयटी मुंबईचे प्रोफेसर अनिल कुमार यांनी नैसर्गिक रित्या प्रदूषण आपण कसे थांबवू शकतो यावर आधारित आपले विचार मांडले. 'प्रदूषित पाणी शुद्धीकरणासाठी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे' या विषयावरती आय.आय.टी खरगपूरचे इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख प्रोफेसर ब्रिजेश दुबे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता तन्मय कांबळे, इको एन्व्हायरमेंट प्रॅक्टिस चे मुख्य अधिकारी कैलास शिरोडकर, 'राज्यातील प्रदूषित पाण्यावरती राबवण्यात आलेले नाविन्यपूर्ण प्रयोग यशोगाथा' ची माहिती मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र,मराठवाडा नागपूर, अमरावती या भागातील पालिका अधिकाऱ्यांनी यांनी सादर केल्या. 'शाश्वत शुद्ध पाण्यासाठी उपाय योजना' या विषयावर नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी सादरीकरण केले.

### शासकीय आधारभूत खरेदी...

सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत. शासकीय हमीभाव केंद्रामार्फत सुरू असलेली खरेदी का बंद करण्यात आली? असा सवाल त्यांनी विचारत खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावीत अशी मागणी केली आहे. हमीभाव केंद्र सुरू करण्यास उशीर झाल्यास हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल आणि त्याचा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू शकतो. सरकारने या गंभीर परिस्थितीकडे त्वरित लक्ष द्यावे, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. आम्ही केलेल्या मागणीची तत्काळ दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

### बलात्काराच्या गुन्हयातून...

त्यांना अटक करण्यात आलेली होती परंतु साक्षी पुरावे अभावी व आरोपीचे वतीने अॅड. एच.आर. सय्यद यांनी भक्कम बाजू मांडल्याने घेण्यात आलेल्या बचाव सिद्ध झाल्याने बीड येथील मेहरबान दुसरे सत्र न्यायालय पटवदकर यांनी आरोपीला सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त केले आहे व आरोपीची सदर गुन्ह्यातून कायमचे सुटका करण्यात आलेले आहे आरोपीच्या वतीने अॅड. एच. आर. सय्यद व अॅड. शेख सोहेल यांनी काम पाहिले व त्यांना अॅड. जहीर पठाण यांनी सहकार्य केले.

### माजलगावच्या स्मशानभुमीत...

वतीने करण्यात आली आहे. यावेळी तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, युवासेना उप तालुकाप्रमुख रामेश्वर काशिद, महिला उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड, गोविंद बजाज, संजय रेदासणी, डॉ. संजय जेथलिया, नितीन मुंदडा, प्रकाश दुगड, पिंटु शेटे, सुरेंद्र कलंत्री यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# धाराशीव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वेमार्गासाठी केंद्रस्तरावर पडताळणी ?

## बीडच्या औद्योगिक विकासाला मिळणार चालना



बीड, (प्रतिनिधी): – अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर आता धाराशीव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्गाच्या प्रस्तावावर केंद्र सरकारकडून पडताळणी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. हा २४० किमी लांबीचा प्रकल्प असून अंदाजे ४,८५७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यावर अंतिम निर्णय कधी होणार याकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. सोलापूर-जळगाव या रेल्वे मार्गासाठी तुळजापूर, उस्मानाबाद, बीड, गेवराई, पैठण, घृणेश्वर, सिल्लोड आणि अजिंठा या मार्गाचा २००८-०९ मध्ये सर्व्हेक्षण जाहीर झाले होते. मात्र, पुढे हे काम पूर्ण झाले नव्हते. २०१७ मध्ये मराठवाडा रेल्वे विकास समितीने हा सर्व्हे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती. त्यानंतर २०१८-१९ मध्ये उस्मानाबाद-बीड-छत्रपती संभाजीनगर या मार्गासाठी आरईसीटी सर्व्हे मंजूर झाला आणि २८ जुलै २०२२ रोजी रेल्वे बोर्डाला अहवाल पाठवण्यात आला. सध्या बीडमध्ये मालवाहतूक प्रामुख्याने ट्रक आणि इतर वाहनांद्वारे केली जाते, जी खर्चिक ठरते. मात्र, रेल्वे वाहतुकीमुळे मालवाहतूक कमी खर्चिक होईल आणि कमी वेळेत मोठ्या प्रमाणावर वस्तू देशभर पाठवता येतील. यामुळे व्यापाऱ्यांना मोठा फायदा होणार असून बीडचा औद्योगिक आणि आर्थिक विकास वेगाने होण्याची शक्यता आहे. मराठवाड्याच्या प्रगतीसाठी हा महत्त्वाचा प्रकल्प असून केंद्रीय रेल्वे मंत्रालय यावर लवकरच निर्णय घेईल, अशी अपेक्षा आहे.

### औद्योगिक विकासाला मिळणार गती

बीडमध्ये अद्याप मोठा औद्योगिक क्षेत्र विकसित झालेले नाही. मात्र, अहिल्यानगर ते बीड रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, पुढील तीन महिन्यात विद्युतीकरणाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. रेल्वे मार्ग सुरू झाल्यास इतर मोठ्या एक्सप्रेस रेल्वे बीडशी जोडल्या जाऊ शकतील. तसेच, धाराशीव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यास बीड हे महत्त्वाचे वाहतूक केंद्र बनेल. मोठ्या कंपन्या आणि उद्योगधंदे स्थापन होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे बीडच्या विकासाला मोठी चालना मिळेल, रोजगार संधी वाढतील आणि व्यापाऱ्यांना आर्थिक फायदा होईल.

# माझी क्लिप तोडून-मोडून दाखवली

## आव्हाडांनी मला शहाणपणा शिकवू नये; सुरेश धसांचा पलटवार

बीड, (प्रतिनिधी) :- परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरणात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सुरेश धस यांच्यावर टीका केल्यानंतर आता त्याला धसांनी प्रत्युत्तर दिलं आहे. जितेंद्र आव्हाडांसारख्या राष्ट्रीय संतांनी अपुऱ्या माहितीवर बोलू नये, त्यांनी आपल्याला शहाणपणा शिकवू नये असा सल्ला सुरेश धस यांनी दिला. परभणीतील लाँग मार्चमधील आपली क्लिप तोडून मोडून दाखवली असा दावा त्यांनी केला. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायासाठी सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे, भाजप आमदार सुरेश धस यांनी परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी पोलिसांची बाजू घेतल्याबद्दल, निशाण्यावर आले. सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी परभणीत लाँग मार्च काढण्यात आला होता. यावेळी आंदोलकांना संबोधित करताना त्यांनी, पोलिसांना मोठ्या मनाने माफ करावं अशी विनंती केली. पण आता त्यावर सुरेश धस यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. सुरेश धस म्हणाले की, लाँग मार्चमध्ये जमलेल्या आंदोलकांची भूमिका ही पोलिस अधीक्षक, महासंचालक आणि इतर अधिकाऱ्यांना निलंबित करावी अशी होती. पण जे अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत किंवा कुठेच रेकॉर्डवर नाहीत त्यांच्यावर कारवाई केली तर पोलिस दलाच्या मनोबलावर परिणाम होईल. त्यामुळेच आपण या पोलिसांना माफ करा असं वक्तव्य केलं. पण आपली क्लिप ही तोडून-मोडून दाखवण्यात आली. जितेंद्र आव्हाडांसारख्या राष्ट्रीय संतांनी अपुऱ्या माहितीवर बोलू नये. त्यांनी आपल्याला शहाणपणा शिकवू नये असा टोला सुरेश धस यांनी लगावला. सुरेश धस म्हणाले की, मी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात कुठलाही भेदभाव केला नाही. या कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी म्हणून मी स्वतः मुख्यमंत्र्यांनाही बोललो. पाच लाखाची मदत दहा लाखाची करून दिली. आव्हाड साहेब, तुम्ही एकदा तरी सूर्यवंशी कुटुंबीयांशी संपर्क केला का? माझ्यासोबत दलित बांधव असतात, मला कळवळा दाखवायची गरज नाही.

## केजमध्ये भरधाव मोटारसायकलच्या धडकेत

# एक ठार, एक गंभीर जखमी




केज, (प्रतिनिधी):-शहरातील कानडी चौकात भरधाव वेगाने आलेल्या मोटारसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात रविवार, (०९ फेब्रुवारी) रोजी रात्री ११.१५ वाजता झाला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रामरतन मारोती गवळी (वय ४०, रा. गणेशनगर, केज) हे आपल्या बजाज डिस्कव्हर (एमएच ४२ व्ही ६८०९) मोटारसायकलवरून घरी जात होते. यावेळी शिवाजी चौकाकडून बसस्टँडकडे जाणाऱ्या हिरो स्प्लेंडर (एमएच ४४ आरसी ८३८८) मोटारसायकलवरील हनुमंत भागवतराव काकडे व सचिन दशरथ मुळे यांनी भरधाव वेगाने गाडी चालवत रामरतन गवळी यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात रामरतन गवळी यांच्या डोक्याला गंभीर मार लागून ते रक्तबंबाळ झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने सरकारी दवाखाना, केज येथे नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. तसेच, या अपघातात सचिन दशरथ मुळे हा देखील जखमी झाला आहे. या प्रकरणी महादेव किसन काटके (रा. गणेशनगर, केज) यांनी केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी मोटारसायकल चालक हनुमंत भागवतराव काकडे (रा. साबला, ता. केज) याच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# आजपासुन बारावी परीक्षा सुरू




वडवणी, (प्रतिनिधी):-जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्यार्थी आणि इतर काही घटक परिक्षा केद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षातघेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी , कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या

### केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागु

अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी, आय.एस. डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम तसेच अंत्ययात्रा यासाठी लागू राहणार नाहीत.

# राज्यात १२ वी परीक्षेला १५,०५,०३७ विद्यार्थी



मुंबई, (वृत्तसेवा):-जानेवारी महिना संपताच विद्यार्थ्यांना ओढ लागलेली असते ती १२ वीच्या परीक्षेची (एरा). विद्यार्थ्यांकडून १२ वीच्या परीक्षेची तयारी देखील जोमाने सुरू असते, आता उद्यापासून बारावीची परीक्षा (कइउ शुरा) सुरू होत असून ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०१५ कालावधीत होणार बारावीची परीक्षा होत आहे. यंदाच्या वर्षी परीक्षेत एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, तर ६ लाख ९४ हजार ६५२ मुली आहेत. यंदा ३७ तृतीयपंथी नागरिकही परीक्षेसाठी बसले आहेत. राज्यात एकूण १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विज्ञान शाखेला ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला तीन लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला तीन लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी तर किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी आहेत. टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी यंदा परीक्षा देणार आहेत. पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय मंडळात ही परीक्षा होणार आहे. महाराष्ट्राचे माध्यमिक उच्च माध्यमिक नव विभागीय मंडळात ही परीक्षा होणार असून नव विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करून हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेमध्ये वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आलेला आहे. दहावी बारावीच्या परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रावर गैरमार्गाचे प्रकरणी आढळून येतील त्या केंद्राची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षापासून कायमची रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगण्यात येत आहे. कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी मंडळांनी अर्ध शासकीय पत्राद्वारे आव्हान केलेले आहेत. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा या दृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आले आहेत. याशिवाय दक्षता समिती कार्यरत असून विभागीय मंडळात विशेष भरारी पदके स्थापन करण्यात आले आहेत. मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी, वैद्यकीय कारणास्तव प्रत्यक्ष तोंडी परीक्षा प्रकल्प व इतर परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेनंतर १२,१५,१७ मार्च रोजी आऊट ऑफ टर्न आयोजित करण्यात आलेले आहे. राज्यात मागील ९ परीक्षा विभागीय मंडळात एकूण ३ हजार ३७६ केंद्र आहेत, त्यातील ८१८ केंद्रावरील केंद्र संचालक बदलले गेले आहेत.

## २७१ भरारी पथके; 'कॉपीमुक्ती'ची कडक अंमलबजावणी

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५

## सहकारातून समृद्धीकडे

२४ जानेवारी २०२५ रोजी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,केंद्रीय सहकार मंत्री,मुरलीधर मोहोळ,महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच राज्यमंत्री डॉ.भोयर यांच्या हस्ते मुंबई येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचा शुभारंभ झाला यावेळी वेगवेगळ्या उपक्रम जसे की नव्याने स्थापन झालेल्या दहा हजार बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, प्राथमिक सहकारी संस्थांसाठी मानांकन प्रणाली अशा विविध उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.नुकतीच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व राज्य शासनाचा सहकार विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषद घेण्यात आली. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये सहकार क्षेत्राचं मोठं योगदान आहे.त्यामुळे दरवर्षी आंतरराष्ट्रीय सहकार दिन साजरा केला जातो, हा दिवस सहकार चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी साजरा करण्याची पद्धत आहे. सहकारी संस्थांचे महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच सहकार क्षेत्राविषयी जनजागृती करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो संयुक्त राष्ट्र महासभेने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष म्हणून घोषित केले आहे. ही घोषणा २०१२ मधील पहिल्या यशस्वी निरीक्षणाचे अनुसरण करते आणि जागतिक स्तरावर शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सहकारी संस्थांची आवश्यक भूमिका ओळखली जाते. जगभरातील सहकारी संस्था हा दिवस वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करतात आणि दरवर्षी आयोजन संस्था या उत्सवासाठी एका थीमवर सहमत होतात, गेल्या काही वर्षांमधील थिम विषय. * २०२५:- सहकार सर्वांसाठी चांगले भविष्य घडवतात. * २०२३- शाश्वत विकासासाठी सहकारी संस्था * २०२२ सहकारी संस्था एक चांगले जग निर्माण करतात * २०२१: एकत्रितपणे चांगले पुनर्बांधणी करा * २०२०: हवामान कृतीसाठी सहकारी संस्था. * आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाची उद्देश: * सहकारी संस्थांवर लक्ष केंद्रित करून, संयुक्त राष्ट्र संघ शाश्वत, समुदाय-केंद्रित उपाय प्रदान करण्यात मॉडेलची प्रभावीता दर्शविण्याचे उद्दिष्ट ठेवते. * जनजागृती आणि भागधारकांचा सहभाग वाढवणे आहे. *सहकारी संस्थांच्या भूमिकेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या वर्षाचा उद्देश आहे. * सहकारी संस्था सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीसह आर्थिक यशाचा समतोल साधतात यावा. * शाश्वत विकास उद्दिष्टे (डऊॠ) साध्य करण्यात सहकारी संस्थांची महत्त्वाची भूमिका आहे. * जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशांमधील सहयोगी प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय सहकार म्हणतात. * शाश्वत पाणी आणि ऊर्जा उपायांवर समन्वित जागतिक प्रयत्नांसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. * सहकार क्षेत्राविषयी जनजागृती करण्यासाठी. *एकता परस्पर सहाय्य आणि लोकशाही सहभागावर भर देणारे सहकार प्रारूप जागतिक समस्या वर उपाय शोधण्यासाठी. * वंचितांना आर्थिकसक्षम आणि सामाजिक दरी भरण्यासाठी. *शाश्वत विकास उद्दिष्टांनी सहकारी चळवळ जोडण्यासाठी. सहकारी संस्था स्व-मदत, लोकशाही, समानता, समता आणि एकता या मूल्यांवर आधारित असतात. सहकारी संस्थांचे सदस्य प्रामाणिकपणा, मोकळेपणा, सामाजिक जबाबदारी आणि इतरांची काळजी घेण्याच्या नैतिक मूल्यांवर विश्वास ठेवतात. सध्याची परिस्थिती पाहता सहकार क्षेत्रातील चुका लपविण्यापेक्षा त्या सुधारण्यावर भर द्यायला हवा आजही लोकांचा सहकारवर विश्वास आहे, त्या विश्वासाला तडा न जाऊन देणे हे सहकार क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीचा, संस्थेचे कर्तव्य आहे. सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी ज्याच्या ठेवीचे व्याज कमी त्या ठेवीच्या परतीची हमी असते, त्यामुळे अधिक ठेवी,अधिक व्याज ही स्पर्धा पतसंस्थांनी निर्माण करू नये असे आर्थिक साक्षर होण्यासाठी महाराष्ट्र शासन सहकार विभाग सतत प्रशिक्षण विविध उपक्रम राबवत असतात.



**डॉ.ज्ञानेश्वर बाबासाहेब शिंदे**
अध्यक्ष : शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.


## टि.सी हरवला आहे.

जाधव अजित भारत या नावाचा इयत्ता १० वी चा टि.सी वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**संपर्क : मो. ८५५४८०८०८४**


## जहीरनामा

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४६ / २०२५ ऐजाज वि निरंक**

मयताचे नाव : मयत जमील अफजलखान पठाण रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड हे दि.१३/०५/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. ऐजाज खान जमीलखान पठाण वय ३० वर्षे, रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड धंदा- मजूरी रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि.बीड
२. असमा पि.जमीलखान पठाण वय २९, धंदा घरकाम रा. बाराभाई गल्ली धारूर किल्ले धारूर जि. बीड

यांनी या न्यायालयास मयत जमील अफजलखान पठाण रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड हे मवत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास इतर घेण्याकरीता, व महत्त्वाच्या कामकाजाकरीता, शासकीय योजनेचा अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जमील अफजलखान पठाण रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ०६/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : २८/०२/२०२५

क. लिपिक

सहा अधिक्षक,
दिवाणी न्यायालय के स्तर, धारुर

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५ पान - ४

## तालुका अध्यक्षपदी सुनिल कांबळे तर उपाध्यक्षपदी राष्ट्रपाल साळवे यांची निवड

माजलगाव, (प्रतिनिधी):-ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून दलित शोषित पीडित आदिवासी मुस्लिम बहुजन वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी व देशात अस्तित्वात असलेल्या मनुवादी व्यवस्थेच्या विरोधात संविधान वाचवण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार सतत तीव्र आंदोलन करत असतात त्याच्या याच कार्याला प्रभावित होऊन माजलगाव येथील युवा नेते सुनील सदाशिव कांबळे यांनी माजलगाव तालुक्याची धुरा सांभाळण्याचा मानस भाई समोर मांडला असता सुनील कांबळे यांच्या आजपर्यंतच्या कार्याची दखल घेत समाजसेवा व संघटन बांधणीची जबाबदारी त्यांच्या वर टाकत माजलगाव तालुका अध्यक्षपदी सुनिल कांबळे यांची निवड केली व राष्ट्रपाल साळवे यांची तालुका ▶▶पान २ वर

# प्रदूषित पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी सर्व समावेशक आराखडा बनवणार-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे




### नगरपालिका आणि महानगरपालिकामध्ये सांडपाण्याचे व्यवस्थापन व शाश्वत उपाययोजना विषयक कार्यशाळा

मुंबई,(वृत्तसेवा):-नद्या, तलाव यांच्या प्रवाहात सांडपाणी मिसळू नये, सांडपाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी पर्यावरण विभाग सर्व समावेशक आराखडा बनवणार असून. नद्यांच्या काठावरील ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या कार्य क्षेत्रात प्रदूषण नियंत्रण नियंत्रणासाठी, प्रदूषित पाण्याचा पुर्नवापर नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या मदतीने करण्यासाठी तांत्रिक कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे, अशी घोषणा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केली. आय. आय. टी., पवई येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व आय. आय. टी., पवई यांच्या संयुक्त विद्यमानाने स्थानिक स्वराज्य संस्थां प्रामुख्याने नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात सांड पाण्याचे व्यवस्थापन व शाश्वत उपाययोजना (मुन्सिपल वेस्ट वॉटर मॅनेजमेंट गॅप्स, सस्टेनबिलिटी अँड वे फॉरवर्ड) या विषयावर एक दिवसाची परिषद आयोजित करण्यात आली होती, या कार्यक्रमात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या. यावेळी नगर विकास (२) विभागाचे प्रधान सचिव के.एच. गोविंदराज,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, आय. आय. टी., पवई च्या पर्यावरण विभाग व इंजिनिअरिंगचे प्रोफेसर मुनेश कुमार चंदेल, प्रोफेसर अनिल कुमार दीक्षित, राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका या क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण अधिकारी तथा तंत्रज्ञ या कार्य शाळेला उपस्थित होते. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, ग्रामपंचायती,नगरपालिका महानगरपालिका या क्षेत्रातून वाहणाऱ्या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात त्या त्या स्थानिक भागातील प्रदूषित ▶▶पान २ वर

# माजलगावच्या स्मशानभुमीत तोडफोड करणाऱ्यावर कारवाई करा



### शिवसेनेची पोलिस प्रशासनाकडे मागणी

माजलगाव, (प्रतिनिधी):- शहरातील राजस्थांनी व वीरशैव स्मशानभुमीत स्वर्गरथ व मोटारसायकल फोडुन धुडगुस घालणा-या गावगुंडांवर कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने पोलिस प्रशासनाकडे ता. १० सोमवारी निवेदनाव्दारे करण्यात आली. शहरातील राजस्थांनी व वीरशैव समाजाच्या असलेल्या स्मशानभुमीत ता. ९ रविवारी अज्ञात माथेफिरूंनी स्मशानभुमीतील गंगाधर गायकवाड यांची मोटारसायकल जाळुन स्वर्गरथाची तोडफोड केली आहे. स्वर्गरथ चालक बाबुभाई शेख यांना देखील मारहाण झाली आहे. त्यामुळे सदरील माथेफिरू हे दहशत निर्माण करत आहेत. यापुर्वी देखील शंभर ते सव्वासे क्विंटल सरपण जाळुन टाकल्याची घटना देखील घडली होती. त्यामुळे या गावगुंडांवर कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेच्या ▶▶पान २ वर

## बलात्काराच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

बीड, (प्रतिनिधी) :- सदर प्रकरणातील गुन्ह्याचे हकीकत अशी की, शेरि फाटा तालुका आष्टी येथील मंगेश नामदेव निकाळजे यांचे विरुद्ध आष्टी पोलीस स्टेशन येथे बलात्काराचा कलम ३६३, ३७६, ३७६ (२) क्ष ५०६ भा.द.वि. प्रमाणे तसेच बाल लैंगिक अत्याचार कायदा ४ ८ १२ अन्वये गुन्हा क्र ३३९ / २०२२ आष्टी पोलीस स्टेशन येथे नोंद करण्यात आलेला होता. आरोपी मंगेश निकाळजे यांच्याविरुद्ध आरोप करण्यात आले होते की त्यांनी गावातील अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन एका लॉजमध्ये अतिप्रसंग करून बलात्कार केला होता व त्या प्रकरणी ▶▶पान २ वर

## १० वी, १२ वी परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

बीड, (प्रतिनिधी):-जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

# शासकीय आधारभूत खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन-राजेभाऊ फड

### शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याची मागणी



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):-परळी वैजनाथ तालुक्यातील शासकीय आधारभूत खरेदी केंद्र बंद पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी सरकारने तातडीने खरेदी केंद्रे सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. परळी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचे उत्पादन होते. मात्र, यंदा खरेदी केंद्र वेळेवर न उघडल्याने शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी बाजारात कमी दर मिळत आहे. परिणामी, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. नाफेड कडे नोंदणी केलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५०% शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. अजूनही नोंदणीकृत शेतकरी प्रतीक्षेत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा खरेदी केंद्राबाहेर लागल्या आहेत. परळी वैजनाथ तालुक्यात एकूण तीन शासकीय हमीभाव केंद्र असून ती एकतर वेळेवर सुरू झाले नाहीत, सुरू करण्यात आले तरी अल्प कालावधीसाठी सुरू ठेवण्यात आले होते. शेतकऱ्यांची लाखो टन सोयाबीन अद्यापही घरी पडून आहे. शासकीय हमीभाव केंद्र बंद करण्यात आले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड आक्रमक झाले आहेत. शासन आणि प्रशासनाला इशारा देत त्यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्यासाठी ▶▶पान २ वर

### शेतकऱ्यांवर सुलतानी संकट!

बीड जिल्ह्यात नाफेडचे ३० सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही. एकूण ४४७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे नोंदणी केली होती, परंतु झालेल्या खरेदीतही बारदाना, कडता, हमालीच्या नावावर शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. नोंदणी झालेल्यांपैकी ५०% शेतकरी अजूनही प्रतीक्षेत असून, केंद्राबाहेर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. अगोदरच अस्मानी संकटाने त्रस्त झालेला बळीराजा आता या सुलतानी सरकारच्या तुघलकी कारभाराने संकटा त सापडला असल्याचा घणाघात राजेभाऊ फड यांनी केला असून, शेतकऱ्यांसाठी संघर्षाची तयारी ठेवल्याचे म्हटले आहे.

# महाराणी ताराबाई विद्यालयात १० वी १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

### मेहनत केली तर उद्याचे भविष्य उज्वल आहे-एपीआय अमन सिरसट



वडवणी, (प्रतिनिधी):-महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एपीआय अमन सिरसट म्हणाले की,विद्यार्थी मित्रांनो आज मेहनत केली तर उद्याचे तुमचे भविष्य उज्वल आहे म्हणून आज अभ्यास करा.आयीस्ता चल जिंदगी अबी कही कर्ज चुका ना बाकी है। कुछ दर्द मिटाने बाकी है।कुछ फर्ज निभाना बाकी है। या कवितेच्या ओळीचा अर्थ आपण लक्षात घेतला तर माझ्या भाषणाचा सार्थक झालं असे समजेल तसेच बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी क्यूआर कोड बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये लावलेले आहेत त्याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता-१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी एपीआय अमन सिरसट तर प्रमुख अतिथी म्हणून बलभीम महाविद्यालय बीड येथील उपप्राचार्य बिराजदार सर,प्रा.तुपे सर,कवडगाव येथील जय जवान विद्यालयाचे प्राचार्य सारोक्ते डी.जी. सर,वडवणी पोलीस स्टेशन येथील राऊत सर तसेच मुंजाळ सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.ठोंबरे सर,श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करू कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थी चि.समाधान मुंडे,कु.राधिका निरडे,कु.प्रिती तुरुकझाडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील आठवणींना उजाळा दिला तसेच मान्यवरांनी व अध्यक्ष प्राचार्य राऊत सर यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# व्यक्तिमत्व विकासासाठी खेळ महत्त्वाचा

### खोखो कर्णधार प्रियंका इंगळे यांचे प्रतिपादन



अंबाजोगाई, (प्रतिनिधी) :-येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने उद्घाटन प्रसंगी भारतीय खो-खो विश्वचषक विजेत्या महिला संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांनी उद्घाटक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. येथून जवळच असलेल्या कळंबअंबा या खेड्यातून आलेल्या कुटुंबातून प्रियंकाने देशाचे नेतृत्व करत कमी वयात यश संपादन केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर हे उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना हा विद्यार्थ्यांचा जडणघडणीचा काळ आहे विविध क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर मेहनत व चिकाटी यांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन घेऊन आतापासूनच तयारीला लागा असे आवाहन करत प्रियंका इंगळे यांच्यापासून आपण हीच प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने कळंब येथील प्रख्यात कवी प्रा.शेखर गिरी, युवा गझलकार सचिन क्षीरसागर हेही याप्रसंगी उपस्थित होते. त्यांनी विविध कविता, मराठी गझल व शेरोशायरी सादर करत विद्यार्थ्यांना अंतर्मुख केले. संस्थेचे उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास गुरुजी यांनीही एक उदबोधनपर कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानेटकर यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदिश चौसाळकर, संचालक माणिकराव लोमटे,अंगदराव कराड, प्रताप पवार, रमन सोनवळर, माजी आमदार रोमन साठे, उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. अनिल नरसिंगे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.व्ही.जी. कळलावे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. श्रावणी तारसे, कु.दिव्या पौळ, कु.वैष्णवी जाधव यांनी केले.आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले.